क्रमांक: ११९०१ /ड-३ (समिती सामन्वय)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ४ ऑगस्ट, २०२१.

## : : परिपत्रक : :

**संदर्भ :** **१)या कार्यालयाचे परिपत्रक क्र.३६१२/ड-३ दिनांक २ मार्च, २०२१.**
**२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.५४५३/ड-३ दिनांक २४ मार्च, २०२१.**
**३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.९३१६/ड-३ दिनांक १८ जून, २०२१.**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व समिती कक्षांना मा.पीठासीन अधिकारी यांच्या निदेशानुसार कळविण्यात येते की, राज्यातील कोविड-१९ महामारीच्या रुग्ण संख्येत घट होत असल्याने महाराष्ट्र विधानमंडळाच्या समित्यांना **कोविड-१९ च्या संदर्भात निर्बंध उठवलेल्या जिल्ह्यांमध्ये दौरे करण्यास** तसेच विधान भवन, मुंबई येथे मंत्रालयीन सचिवांची साक्ष घेण्यास अनुमती असेल. तथापि, ज्या जिल्ह्यांमध्ये कोविड विषयक प्रतिबंध जारी आहेत त्या जिल्ह्यांमध्ये दौरे आयोजित करण्यात येवू नयेत. तसेच असे दौरे आणि बैठकांच्या संदर्भात कोविड सुरक्षाविषयक नियमांचे पालन करणे अनिवार्य राहील. या अटींसह मा. पीठासीन अधिकारी यांच्या मान्यतेने राज्यांतर्गत दौऱ्यास व विभागीय सचिवांच्या साक्षीस अनुमती देण्यात येत आहे.

**( राजेंद्र भागवत )**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**याची प्रत :**

१) सर्व समित्यांचे मा.समिती प्रमुख व मा.सदस्य.
२) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

**प्रतिलिपी :**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
२) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्ष नेते (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.